# कॅशलेस अर्थव्यवस्था आणि नवे पर्याय



काही दिवसांपूर्वीच झालेल्या चलनबदलामुळे भारतातल्या अर्थव्यवस्थेमध्ये बरेच बदल घडले आणि पुढेही घडतीलच. पूर्वकल्पना न देताना झालेल्या या बदलामुळे काळा पैसा उघडकीस आणण्यास आणि तो चलनातून बाद करण्यास मदत झाली असली तरी नव्या नोटांच्या तुटवड्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. एटीएम, बँकामध्ये नोटाबदलासाठी रांगा लागल्या. सध्या या रांगा बऱ्याच कमी झाल्या आहेत. मात्र याच काळात अनेक वर्षांपासून ज्याची गरज होती आणि जे प्रत्यक्षात आणणेसुद्धा शक्य होते ते आता घडताना दिसत आहे. ते म्हणजेच कॅशलेस व्यवहार. हा कॅशलेस इकॉनमी काय प्रकार आहे? यासाठी कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत? आपल्यासाठी कोणते पर्याय योग्य ठरतील? याविषयी अधिक जाणून घेऊ.

**सध्याच्या अर्थव्यवस्थेतील व्यवहार :** सध्या भारतात मोठ्या प्रमाणावर रोख पैशाचा म्हणजेच नोटांद्वारे व्यवहार होतात. ही पद्धत बऱ्याच वर्षापासून सुरू आहे. छापील नोटांच्या व्यवहारात भारत आघाडीवर आहे. या पद्धतीचे तोटे चलनबदलाच्या निमित्ताने आपल्या समोर आले आहेतच. अलीकडे गेल्या काही वर्षात प्लॅस्टिक मनी (डेबिट/क्रेडिट कार्डस) चा वापर वाढला आहे. तरीही ही पद्धत या व्यवस्थेमध्ये म्हणाव्या इतक्या मोठ्या प्रमाणात वापरली जात नाही.

**कॅशलेस अर्थव्यवस्था :** ह्या अर्थव्यवस्थेनुसार व्यवहारासाठी कॅश (रोख रक्कम) वापरण्याऐवजी इतर पर्याय वापरले जातात, उदाहरणार्थ प्लॅस्टिक मनी, इ-वॉलेट, इंटरनेट बँकिंग, ज्यामध्ये छापील नोटांचा अजिबात समावेश नसतो. या प्रकारच्या अर्थव्यवस्थेची भारताला नक्कीच गरज आहे. ही व्यवस्था मोठ्या प्रमाणात अंमलात आणणेसुद्धा शक्य आहे. भारतीयांमधील वाढलेला मोबाईल फोन्सचा वापर यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. या अर्थव्यवस्थेमुळे सर्व व्यवहार बऱ्यापैकी पारदर्शक असतील, सुरक्षित असतील आणि त्यामुळे काळ्या पैशाला/गैरव्यवहारांना थांबवणे शक्य आहे. ह्या व्यवस्थेनुसार व्यवहार करणेसुद्धा सोपे असल्यामुळे लवकरच याचा मोठा प्रसार होईल असे चित्र या चलनबदलाच्या निमित्ताने का होईना पण दिसू लागले आहे.

**कॅशलेस अर्थव्यवस्थेचे फायदे :**

- छापील नोटांमधून होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा बसेल.
- चलन व्यवस्थापन, नोटांच्या छपाईचा सरकारी खर्च वाचेल.
- बनावट नोटा छापण्याचे प्रकार बंद होतील.
- आयकर विभागाकडे प्रत्येक व्यवहाराची नोंद होईल.
- रोख रक्कम, सुटे पैसे जवळ बाळगण्याची गरज राहणार नाही.
- धनादेश वटण्याची वाट पहावी लागणार नाही, त्यामुळे सर्व व्यवहार जलद होतील.
- सुरक्षित व्यवहार आणि गरजेनुसार अनेक पर्याय उपलब्ध.

आता कॅशलेस अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायांची ओळख करून घेऊ:


१. प्लॅस्टिक मनी (डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड)
२. इंटरनेट बँकिंग
३. इ-वॉलेट/ मोबाइल वॉलेट
४. यूपीआय (UPI)
५. मोबाइल बँकिंग व USSD
६. POS (पॉइंट ऑफ सेल)
७. आधार कार्ड द्वारे



**१. प्लॅस्टिक मनी:** ह्या पर्यायामध्ये डेबिट कार्ड/क्रेडिट कार्डचा वापर होतो. खातेदार बँक खात्याशी जोडलेल्या कार्डची बँककडे गरजेनुसार मागणी करतो.
**डेबिट कार्ड :** आधीच खात्यात असलेल्या रकमेतून व्यवहार/ खरेदीसाठी डेबिट कार्ड (PrePay)
**क्रेडिट कार्ड :** आधी व्यवहार/खरेदी नंतर महिन्याखेरीस बँकेने पाठवलेल्या बिलानुसार रक्कम बँकमध्ये जमा करण्यासाठी क्रेडिट कार्ड. (PostPay)
प्रत्यक्ष वापर करताना दोन्ही कार्डचा वापर सारख्याच पद्धतीने होतो. कार्डधारक एटीएम मशीनमध्ये जाऊन त्याचा सुरक्षित चार अंकी पिन टाकून पैसे काढू शकतो. दुकानांमध्ये खरेदी करू शकतो (कार्ड स्वाईप- कार्ड दुकानमधील मशीनमध्ये सरकवून). यानंतर बँकमधून त्या व्यक्तीच्या खात्यातून रक्कम थेट दुकानदाराच्या खात्यात जमा होते.

**२. इंटरनेट बँकिंग :** या पर्यायामध्ये आधी बँककडे अर्ज करावा लागतो. त्यानंतर बँक तुम्हाला यूजर आयडी व पासवर्ड देते. याला तुमचं "ऑनलाइन बँक खाते" असेही म्हणता येईल. तो आयडी, पासवर्ड घेऊन तुम्ही तुमच्या बँकेच्या इंटरनेट बँकिंग वेबसाइटवर जाऊन लॉगिन करावे, त्यानंतर ते खाते ऑनलाइन व्यवहारांसाठी तयार होते. खरेदी करताना इंटरनेट बँकिंग पर्याय निवडायचा, आपली बँक निवडायची, यूजर आयडी पासवर्ड टाकायचा, तुमच्या फोनवर आलेला OTP तिथे टाकायचा की झाली खरेदी (व्यवहार). हा पर्याय सर्व पर्यायांमध्ये नक्कीच सर्वात सुरक्षित आहे. तुमच्या खात्यामधून कोणताही व्यवहार झाला की एक ईमेल आणि एक SMS सुद्धा येतो. तुम्ही ऑनलाइन/ऑफलाइन केलेल्या सर्व व्यवहारांची नोंद या वेबसाइटवर कधीही पाहू शकता, आणि ते स्टेटमेंट प्रिंट करू शकता. यालाच "नेटबँकिंग" सुद्धा म्हणतात.





**३. इ-वॉलेट/मोबाइल वॉलेट:** हे एक मोबाइलमध्ये असलेले आभासी पाकीट म्हणता येईल. जे व्यवहारासाठी खऱ्याखुऱ्या पाकीटाची जागा घेऊ पाहतेय. या मोबाइल वॉलेटमध्ये आपण ठराविक रक्कम साठवू शकतो आणि ती कुठेही व्यवहारासाठी वापरता येते. ऑनलाइन व्यवहार (खरेदी/रीचार्ज/पैसे पाठवणे/इ) तसेच ऑफलाइन ठिकाणी जसे की किराणा विक्रेते, रिक्षा/टॅक्सी चालक, दैनंदिन विक्रेते

(भाजी, पेपर,इ) यांना पैसे देण्यासाठी सहज करता येतो. या वॉलेटमध्ये तुम्ही तुमच्या बँक खात्यामधून क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/नेटबँकिंग द्वारे पैसे भरायचे आणि ते पैसे नंतर वरीलप्रमाणे ठिकाणी Send Money / Receive Money असे पर्याय वापरुन वापरू शकता. हा पर्याय पूर्ण सुरक्षित असून तुमचे वॉलेट यूजर आयडी पासवर्ड यांनी सुरक्षित केलेले असून तुमच्या वॉलेटमधून कोणताही व्यवहार झाला की एक ईमेल आणि एक SMS सुद्धा येतो.

**४. यूपीआय (Unified Payment Interface UPI) :** यूपीआय हा एक नवा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून भविष्यात याचा वापर अधिक केला जाईल अशी आशा आहे. या पद्धतीमध्ये यूजर आयडी/पासवर्ड/बँक खात्याचा क्रमांक, IFSC, यापैकी कशाचीही गरज नाही. यूपीआयमध्ये केवळ एका यूजरनेमचा वापर होतो ज्याद्वारे व्यवहार थेट बँकमधूनच पार पडतात. या यूजरनेमला VPA (व्हर्च्युअल प्रायवेट ॲड्रेस) म्हणतात. यामुळे पैसे पाठविण्याकरिता केवळ या नावाचाच करून काही क्षणात पैसे पाठवता येतात. यूपीआय व मोबाइल वॉलेट या दोन वेगळ्या गोष्टी असून यूपीआयमध्ये मोबाइल वॉलेट प्रमाणे रक्कम भरावी लागत नाही यासाठी थेट बँक खात्यामधूनच व्यवहार केला जातो. हे वापरण्यासाठी सध्या तरी तुमचा फोन तुमच्या बँक खात्याला मोबाइल/नेटबँकिंगमार्फत जोडलेला असावा. त्यानंतर तुम्ही तुमच्या बँकचं अधिकृत ॲप फोनमध्ये डाऊनलोड करा. तोच मोबाइल क्रमांक यूपीआयशी जोडा आणि व्यवहारासाठी ते ॲप तयार. याला ऑफलाइन पर्याय सुद्धा उपलब्ध आहे. हा पर्याय तुमच्या फोनवरुन *९९# डायल करून वापरता येईल.




**५. मोबाइल बँकिंग :** हा पर्याय बेसिक फोन्स/इंटरनेट नसलेल्या फोन्ससाठी तयार करण्यात आला असून यामध्ये दोन उपपर्याय उपलब्ध आहेत. दोन्ही पर्याय वापरण्यासाठी प्रथम तुमचा फोन क्रमांक बँकमध्ये तुमच्या खात्याला जोडावा लागेल.

त्यानंतर तुम्हाला MMID, यूजरनेम व पासवर्ड दिला जाईल. ज्याद्वारे बँकेच्या निर्देशानुसार IMPS द्वारे खाते क्रमांक आणि IFSC कोडची माहिती SMS द्वारे पाठवून पैसे सहज पाठवता येतात. मोबाइल बँकिंग पद्धतीच वैशिष्य म्हणजे हा पर्याय अगदी कोणत्याही फोनवर ऑफलाइन म्हणजेच इंटरनेट नसताना वापरता येतो.

I. **SMS द्वारे** : यासाठी बँकेच्या निर्देशानुसार काही ठराविक संज्ञा दिलेल्या असतात जसे की <IMPS><Mobile No><MMID><amount><User ID><MPIN> ही एसबीआयची संज्ञा आहे.

II. **USSD द्वारे (NUUP) :** सरकारतर्फे सर्व बँकांना सूचना देऊन ***९९#** एकच क्रमांक निश्चित करण्यात आला असून याद्वारेसुद्धा खात्यातील शिल्लक तपासणे, पैसे पाठवणे हे व्यवहार करता येतात.

**६. पॉइंट ऑफ सेल (POS) :** ह्या पर्यायामध्ये आपण विक्रेत्याकडे वस्तु खरेदी करतो, त्यानंतर विक्रेता बिलची सांगून रक्कम त्याच्याकडील POS मशीनमध्ये कार्ड टाकून पिन दाबायला सांगतो. ह्यावेळी आपण प्लॅस्टिक मनीमध्ये पाहिलेलेच डेबिट/क्रेडिट कार्डच वापरतो. त्या मशीनमध्ये आपल कार्ड सरकवून (स्वाईप करून) पिन टाकला की आपल्या बँक खात्यामधून रक्कम लगेच विक्रेत्याच्या खात्यात जमा होते. लगेचच एक पावती प्रिंट करून मिळते. ही मशीन्स हल्ली सर्व ठिकाणी पहायला मिळतात जसे की दुकाने, थिएटर, पेट्रोल पंप, इ. मध्ये नवा प्रकार म्हणजे NFC द्वारे फोन टॅपकरून पैसे जमा करणे (भारतात उपलब्धता खूप कमी).



**७. आधार कार्ड बँकिंग** : Aadhaar Enabled Payment System (AEPS). या प्रकारच्या व्यवस्थेमध्ये आधी तुमचं आधार कार्ड बँक खात्याला संलग्न करावं लागेल. त्यानंतर ज्या ठिकाणी पैसे द्यायचे आहेत तिथे तुमचा आधार क्रमांक टाका व तुमच्या बोटाद्वारे फिंगरप्रिंट द्या लगेच व्यवहार पार पडेल. म्हणजेच आधार कार्डवरील क्रमांक आणि बायोमेट्रिक पद्धतीने बोटाचं स्कॅन याद्वारे पैसे ट्रान्सफर, शिल्लक, पैसे काढणे, इ व्यवहार करता येतात. ही व्यवस्था

सध्यातरी खूपच कमी ठिकाणी आहे.

**कॅशलेस अर्थव्यवस्थेमध्ये घ्यायची काळजी :**

- तुमचा पासवर्ड कोणालाही सांगू नका.
- तुमचा पासवर्ड कार्डवर किंवा कोठेही लिहून ठेऊ नका.
- तुमच्या अकाऊंटची माहिती (यूजरनेम/पासवर्ड/OTP/CVV) कोणालाही सांगू नका.
- तुम्हाला दहा लाखाचे बक्षीस लागले आहे किंवा लॉटरी लागली आहे, आम्ही बँकमधून बोलत आहोत, तुमचा आयडी / पासवर्ड / क्रेडिट कार्ड नंबर / डेबिट कार्ड नंबर / ओ.टी.पी. सांगा, वगैरे सांगून फोन करणाऱ्यांना काहीही सांगू नका. असे फोन केवळ तुमची फसवणूक करण्यासाठी करण्यात आलेले असतात. कोणतीही बँक आपल्या ग्राहकांना कधीही अश्या प्रकारची माहिती फोनवर मागत नाही.
- आपल्या कार्डचे डिटेल्स कोणत्याही साइटवर Save करू नका.
- ठराविक दिवसानंतर तुमचा पासवर्ड आणि पिन बदलत रहा.
- नेटबँकिंग करताना Virtual Keyboard चा वापर करा (पासवर्ड कि-बोर्डद्वारे टाईप करू नका).

# मोबाइल वॉलेट म्हणजे काय आणि ते कसे वापरायचे?

मोबाइल वॉलेट, पेटीएम, हे हल्ली हमखास ऐकायला मिळणारे शब्द. मोबाइल वॉलेट म्हणजे मोबाइलमध्ये असलेले एक आभासी पाकीट, जे व्यवहारासाठी खऱ्याखुऱ्या पाकीटाची जागा घेऊ पाहत आहे. या मोबाईल वॉलेटमध्ये आपण ठराविक रक्कम साठवू शकतो आणि ती कुठेही व्यवहारासाठी वापरता येते. ऑनलाइन व्यवहार (खरेदी/रीचार्ज/पैसे पाठवणे इत्यादी), तसेच ऑफलाइन ठिकाणी जसे की किराणा विक्रेते, रिक्षा/टॅक्सी चालक, दैनंदिन विक्रेते (भाजी, पेपर, इत्यादी), थिएटर काऊंटर यांना पैसे देण्यासाठी सहज करता येतो.

या वॉलेटमध्ये तुम्ही तुमच्या बँक खात्यामधून क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/नेटबँकिंग द्वारे पैसे भरायचे आणि ते पैसे नंतर वरीलप्रमाणे ठिकाणी Send Money / Receive Money असे पर्याय वापरुन वापरू शकता. हा पर्याय पूर्ण सुरक्षित असून तुमचं वॉलेट यूजर आयडी, पासवर्ड यांनी सुरक्षित केलेले असून तुमच्या वॉलेटमधून कोणताही व्यवहार झाला की एक ईमेल आणि एक SMS सुद्धा येतो.

सध्या बरेच मोबाइल वॉलेट उपलब्ध आहेत.

- पेटीएम (Paytm)
- फ्रीचार्ज (Freecharge)
- मोबीक्वीक (Mobikwik)
- ऑक्सिजेन (Oxigen)

आपण यासाठी उदाहरणार्थ सर्वात जास्त वापरले जाणारे पेटीएम ॲप पाहूया

१. प्रथम हे ॲप तुमच्या फोनवर डाऊनलोड करून घ्या.




२. यानंतर Profile > Login To Paytm > Sign Up इथे जाऊन तुमचा मोबाइल क्रमांक, इमेल आयडी व तुम्हाला हवा असलेला पासवर्ड टाका व Sign Up वर क्लिक करा. तुम्हाला खात्री करण्यासाठी एक OTP असलेला SMS मेसेज येईल. तो टाइप करून Verify वर क्लिक करा(दाबा). आता तुमचं Paytm Walletतयार झालय.

३. आता Home वर जा आणि Add Money पर्याय निवडा. किती रक्कम वॉलेटमध्ये टाकायची आहे ती Amount मध्ये टाइप करा व Add Money वर टॅप करा. आता तुम्हाला कोणत्या मार्गाने पैसे वॉलेटमध्ये भरायचे आहेत तो निवडा.

४. यासाठी तुमच्यासमोर तीन पर्याय आहेत Netbanking, Debit Card, Credit Card. यापुढे योग्य ते पर्याय निवडा आणि तुमच्या वॉलेट मध्ये तुमच्या बँकमधून रक्कम लगेच जमा केली जाईल.

५. आता तुम्ही Home वर जाऊन Passbook वर टॅप करा. तुम्हाला शिल्लक, केलेले व्यवहार,इ सर्व माहिती मिळेल.

## पेटीएम वापरुन पैसे पाठवण्यासाठी खालील प्रमाणे कृती करा : -

१. पेटीएम ॲप उघडून लॉगिन करा (आधी केले नसेल तर)
२. यानंतर Home वर Pay हा पर्याय निवडा
३. इथे तुम्हाला Scan Code, Mobile No, Show Code, Payment Request असे चार पर्याय दिसतील.
४. स्कॅन कोड द्वारे ज्याला पैसे पाठवायचे आहेत त्याचा कोड फोन समोर धरून स्कॅन करा. त्यानंतर किती रक्कम पाठवायची आहे ते टाइप करा आणि Pay वर टॅप करा. तुम्ही यशस्वीरीत्या पैसे पाठवले आहेत.
५. कोड स्कॅन वापरायचा नसेल तर ज्याला पैसे द्यायचे आहेत त्याचा मोबाइल क्रमांकसुद्धा टाकून तुम्ही पैसे पाठवू शकता यासाठी चार पर्यायांपैकी Mobile No हा पर्याय निवडा, मोबाइल क्रमांक व रक्कम टाका की झाले पैसे ट्रान्सफर.

## पेटीएम वापरुन पैसे स्वीकारायचे/घ्यायचे असतील तर खालीलप्रमाणे कृती करा : -

१. Home मध्ये जाऊन वरील पर्याय बाजूला सरकवा
२. नंतर Accept Payment पर्याय निवडा
३. इथे तुम्ही मोबाइल क्रमांक व रक्कम टाका नंतर Request Money आणि पैसे स्वीकारू शकता
किंवा मोबाइल क्रमांकच्या बाजूला दिसणारा छोटा आयकॉन निवडा व रक्कम टाकून Generate QR Codeपर्याय निवडा व नंतर तो कोड ज्याच्याकडून पैसे स्वीकारायचे आहेत त्याच्या फोनमध्ये स्कॅन करायला सांगा.
४. पाठवणाऱ्याच्या वॉलेटमधून पैसे लगेच तुमच्या वॉलेटमध्ये जमा होतील.

## मोबाइल वॉलेटने रीचार्ज करण्यासाठी : -

१. वॉलेटमध्ये लॉगिन करा
२. वॉलेट मध्ये रक्कम जमा करा
३. Recharge पर्याय निवडा, Prepaid/Postpaid निवडा, मोबाइल क्रमांक टाका, किती रकमेचा रीचार्ज करायचा आहे ती रक्कम टाका व Recharge Now वर टॅप करा
४. तुम्हाला त्या मोबाइल क्रमांकावर रीचार्ज झाल्याचा मेसेज मिळेल.
वरील प्रमाणेच मोबाइल, डिश टीव्ही DTH, डाटा कार्ड, इलेक्ट्रिसिटी/फोन/लँडलाइन बिल, सोबतच काही ठिकाणी गॅस/ब्रॉडबँड बिल, रेल्वे/विमान/बस तिकीट बुकिंग यासाठीसुद्धा वॉलेट वापरू शकता .

इतर वॉलेटबद्दल माहिती खाली दिली आहे. त्यांचा संदर्भ घ्या. त्या वॉलेट्ससाठी सुद्धा बऱ्यापैकी पेटीएम प्रमाणेच पैसे ट्रान्सफर केले जातात :

Mobikwik
Freecharge
Oxigen

काही बँकानीसुद्धा स्वतःची वॉलेट्स उपलब्ध करून दिली आहेत. जसे की स्टेट बँक ऑफ इंडियाने बडी(SBI Buddy) / HDFC PayZapp / ICICI Pockets / Axis Lime ही वॉलेट्स ठराविक बँकतर्फे सादर केलेली असली तरी कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणताही वॉलेट वापरू शकतो.

या वॉलेट सर्विसेस सोबत जवळपास प्रत्येक टेलीकॉम ऑपरेटरनीसुद्धा स्वतःचे वॉलेट सादर केले आहेत. या सर्वांच काम एकच असले तरी फरक फक्त त्यामध्ये एकूण किती सुविधा आहेत इथे आहे. त्यामुळे गरजेनुसार वॉलेट निवडा. त्यांपैकी काही खालीलप्रमाणे:

Airtel Money | Vodafone mPesa | Idea Money |
BSNL SpeedPay | Aircel Money | JioMoney |

# यूपीआय (UPI) म्हणजे काय? ते कसे वापरायचे?

यूपीआय म्हणजे युनिफाईड पेमेंट इंटरफेस (UPI - Unified Payment Interface). यूपीआय ही एक अशी व्यवस्था आहे ज्यामुळे अनेक बँकाच्या अनेक सुविधा एकाच मोबाइल ॲप्लिकेशन द्वारे एकत्र आणून सोयिस्कर पैसे पाठवणे, रक्कम भरणे, खरेदी एकाच ठिकाणी एकाच ॲपमध्ये उपलब्ध होते. सोबतच यामध्ये peer to peer रक्कम जमा करण्याची पद्धत ज्यामध्ये सोयीनुसार नियोजित दिवशी आणि गरजेप्रमाणे रक्कम पाठवली जाते. यूपीआयमधून पैसे पाठवताना लॉगिनची गरज नाही, खातेक्रमांकांची गरज नाही, IFSC ची गरज नाही. केवळ एका छोट्या यूजरनेम (वापरकर्त्याच नाव) ज्याला यूपीआयमध्ये VPA किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस म्हटले जाते या VPA सहाय्याने कोणालाही अवघ्या काही सेकंदात पैसे पाठवता येतात.

## यूपीआयची गरज काय ?

नेटबँकिंगसारख्या पद्धती इंटरनेटवर व्यवहार अधिक सुरक्षित बनवण्यासाठी सादर करण्यात आल्या. पण यावरून पैसे पाठवणे बऱ्यापैकी वेळखाऊ आणि सामन्यांच्या दृष्टीने अवघड आहे. त्यासोबतच बऱ्याच पर्यायांच्या गर्दीने नेमकी कोणती सेवा घ्यायची याविषयीसुद्धा गोंधळ उडतो. म्हणूनच एका सरळसोप्या पद्धतीची सुरुवात केली गेली असून याचं नाव यूपीआय असं आहे. ही पद्धत सर्व दिवशी कोणत्याही सुट्टीविना वापरता येते. आणि यासाठी तुमच्याकडे असलेल्या मोबाइलचा वापर केला जातो.

समजा तुम्ही जवळच्या दुकानामध्ये गेलात किंवा कोणाला पैसे खात्यावर पाठवायचे असतील तर त्यावेळी पैसे

देताना तुम्हाला त्यांच्या खात्याची माहिती मिळवून बँकमध्ये beneficiary जोडावी लागते. त्याला वेळ लागू शकतो तसेच दरवेळी OTP टाका बसावा लागतो. प्लॅस्टिक मनी जसे की क्रेडिट/डेबिट कार्ड वापरताना तुमचा पिन सुरक्षित राहत नाही. मोबाइल वॉलेटला त्या वॉलेटमध्ये रक्कम भरावी लागते. या सर्वांवर उपाय म्हणजे यूपीआय यामध्ये थेट बँकमधून व्यवहार होतो.

## मोबाइल वॉलेट आणि यूपीआयमधील फरक :

पेटीएमसारख्या मोबाइल वॉलेट आणि यूपीआयमधला फरक म्हणजे वॉलेटमध्ये बँकमधून रक्कम भरावी लागते मगच ते वॉलेट वापरता येते. तसेच वापर झाला नाही तर मोबाइल वॉलेटमध्ये पैसे बिनव्याजी तसेच पडून राहतात. मात्र यूपीआयमध्ये थेट बँकखात्यातून व्यवहार केला जातो. त्यामुळे निम्मा वेळ वाचून सहज पैसे पाठवता येतात. यूपीआय एकच्या बँक खात्यामधून सरळ दुसऱ्याच्या खात्यात जमा होतात. यूपीआयमुळे मोबाइल वॉलेट लगेच बंद होतील अशी परिस्थिती सध्या नसली तर भविष्यात यूपीआयचा वापर वाढीस लागून मोबाइल वॉलेटमध्येच यूपीआयचा समावेश केला जाण्याची शक्यता आहे.

## यूपीआयचे उपयोग :

सध्या यूपीआयद्वारे ती सर्व कामे करता येतात जी नेटबँकिंगने करता येतात. (पैसे पाठवणे, पैसे स्वीकारणे, रीचार्ज, बिल भरणा, तिकीट आरक्षण,खरेदी,इ.) सध्या मोबाइल वॉलेट प्रसिद्ध असले तरी यूपीआयमधील सोपेपणा लक्षात येताच याचा वापर नजीकच्या काळात नक्कीच वाढेल आणि इतर ठिकाणी जसे की टॅक्सी, कॅब, रिक्षा अशा ठिकाणी सुद्धा यूपीआयचा वापर होईल.

## यूपीआय कसे वापरायचे ?

I. मोबाइल ॲप (ऑनलाइन - इंटरनेट असताना)
II. USSD (ऑफलाइन - इंटरनेट शिवाय)

**I. यूपीआय मोबाइल ॲप :** यासाठी तुम्ही ॲप स्टोअरवर जाऊन तुमच्या बँकचं नाव टाकून पुढे UPI लिहा आणि सर्च करा. तुम्हाला बँकचं UPI ॲप दिसेल. उदा SBI UPI, Axis UPI, ICICI UPI इ. जवळपास सर्वच प्रमुख बँकांनी UPI ॲप्स सादर केली आहेत. याऐवजी फ्लिपकार्ट तर्फे सादर केलेले PhonePe फोनपे हे ॲपसुद्धा वापरू शकता. जवळपास २५ हून अधिक यूपीआय ॲप्स प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. सर्वच ॲप सारखच काम करणार आहेत आणि यातले कोणताही ॲप घेतले तरी ते सर्वच बँक खाते धारकांना चालणार आहे.

**"फोनपे" वापरण्याची पद्धत** खाली दाखवली आहे. इतर ॲप्ससुद्धा थोड्याफार बदलाने असेच काम करतील.

**टीप :** ह्यास स्टेप्स मोठ्या वाटत असल्या तरी अजिबात अवघड नाहीत. स्पष्टता यावी म्हणून अधिक विश्लेषण केले आहे. खरेतर या सर्व पायऱ्यासाठी केवळ पाच मिनिटाहून कमी कालावधी लागतो.

१. सर्वात आधी PhonePe ॲप डाऊनलोड करा.

२. यानंतर तुमचा फोन क्रमांक टाका आणि verify करा. लक्षात ठेवा हा फोन क्रमांक तुमच्या बँकला जोडलेलाच असायला हवा आणि हाच कायम वापरला जाईल. Verify वर टॅप करताच SMS द्वारे OTP मिळेल. तो टाईप करा आणि Verify करा.

३. यानंतर काही प्राथमिक माहिती जसे की तुमचं नाव, ईमेल आयडी विचारल जाईल तो टाका आणि नंतर एक चार अंकी पिन सेट करा. लक्षात ठेवा हाच पिन तुम्हाला दरवेळी वापरावा लागणार आहे. त्यामुळे काळजीपूर्वक पिन निवडा. I Accept वर टिक करा आणि Activate Account वर टॅप करा.

४. यानंतर तुमचा VPA निवडा. तुमचं नावच असले पाहीजे असं नाही. तुमच्या मनाप्रमाणे लक्षात ठेवता येईल असे नाव निवडा. उदा. myupi@ybl, testupi@sbi नाव टाकल्यानंतर Create New VPA वर टॅप करा.
(लक्षात ठेवा हे नावच पुढे तुमच्या व्यवहारांसाठी वापरले जाणार आहे.)
VPA abc@sbi अशाच स्वरुपात असतील हे case sensitive नाहीत म्हणजे ABC@sbi व abc@sbi एकच.

५. यानंतर तुम्हाला तुमची बँक निवडायला सांगितले जाईल. आणि तुम्ही योग्य ती बँक निवडताच लगेच तुमचं अकाऊंट तयार होईल. जर तुमच्याकडे MPIN नसेल तर नवा तयार करा व SET PIN वर टॅप करा.
अन्यथा RESET MPIN निवडून जुना MPIN बदलून नवा लावता येईल.
(काही जणांना दरम्यान तुमच्या कार्डवरील शेवटचे सहा अंक विचारले जातील व पिन विचारला जाईल. जर आधी MMID वापरला असेल वगैरे कारणास्तव, जे काही विचारले जाईल ते टाकत जा)

६. यानंतर तुम्हाला फोनपे सुरू झालेल दिसेल. आता तुम्ही कधी केव्हाही व्यवहार करू शकता.

वरील स्टेप्स थोडक्यात सांगायच्या तर ॲप डाऊनलोड करा, फोन क्रमांक टाका, फोनपेसाठी पिन, MPIN सेट करा. झाले अकाऊंट तयार. व्यवहार करताना चार अंकी फोनपे पिन आणि सहा अंकी MPIN यांची गरज पडते.

## यूपीआयद्वारे पैसे कसे पाठवायचे ?

वरील प्रमाणे यूपीआय ॲप इंस्टॉल करा आणि नंतर पुढे जा

१. आता Transfer Money खालील Send पर्याय निवडा.

२. आता तुम्हाला Contacts, VPAs, Bank Accounts असे तीन पर्याय दिसतील.

३. तुम्ही कसे पैसे पाठवणार आहात त्यानुसार पर्याय निवडा आम्ही उदाहरणार्थ VPA निवडत आहोत.

४. आता Add VPA वर क्लिक करून Beneficiary VPA मध्ये ज्यांना पैसे पाठवायचे आहेत त्यांचा VPA टाका व नंतर Verify वर क्लिक करा. त्यांचं नाव खाली आपोआप दिसेल. आता Confirm वर टॅप करा

५. आता किती रक्कम पाठवायची आहे ते टाइप करा व Send वर टॅप करा.

६. शेवटी तुम्हाला खात्री करण्यासाठी MPIN विचारला जाईल व लगेच पैसे ट्रान्सफर सुद्धा होतील.

वरील स्टेप्स थोडक्यात सांगायच्या तर पैसे पाठवताना ॲप उघडा > Phone Number & PhonePe पिन टाका > Send > VPA टाका Verify करा > रक्कम टाका > MPIN टाका > झाले पैसे ट्रान्सफर.

याचप्रमाणे तुम्ही रीचार्ज, खरेदी, बिल भरणा करू शकता. तुमच्या बँक खात्यामधील शिल्लक सुद्धा तुम्ही लगेच ह्या ॲप मध्येच तपासता येते.
पैसे स्वीकारण्यासाठी Request हा पर्याय निवडा. व ज्यांच्याकडून पैसे हवे आहेत त्याचा VPA निवडा. त्यांना तसा मेसेज जातो व ते लगेच तुम्हाला पैसे पाठवू शकतात.

यूपीआय वापरासाठी काही बँकच्या नियमांनुसार आधी एकदा बँक मध्ये तुमचा मोबाइल क्रमांक नोंदवायला हवा. ज्यानंतर तुम्हाला MMID मिळेल.
रजिस्ट्रेशनची ही प्रक्रिया केवळ एकदा करावी लागेल जी नवे कार्ड घेण्यासारखी किंवा नेटबँकिंग सुरू करण्यासाखीच आहे. याद्वारे तुम्हाला userid व mpin पुरवला जाईल. याबद्दल तुम्ही तुमच्या बँक शाखेमध्ये चौकशी करा आणि USER ID व MPIN मिळवा.

### II. यूपीआय साठी ऑफलाइन पद्धत म्हणजे USSD द्वारे व्यवहार :

यूपीआयद्वारे ऑफलाइन व्यवहार NUUP (National Unified USSD Platform) म्हणता येईल.

*USSD म्हणजे आपण बॅलन्स तपासण्यासाठी जसे *१२१# सारखे क्रमांक डायल करतो तेच.*

USSD - Unstructured Supplementary Service Data

आरबीआयने सर्व बँक खातेधारकांसाठी एकच क्रमांक सादर केला असून तो ***९९#** असा आहे.

यामध्ये सुद्धा MMID व MPIN ची गरज पडते.

पैसे पाठवताना तीन पर्याय उपलब्ध

a. MMID द्वारे : ज्यांना पैसे पाठवायचे आहेत त्यांचा मोबाइल क्रमांक व MMID लागतो.

b. खाते क्रमांकद्वारे : यामध्ये अकाऊंट नंबर, IFSC लागतो.

c. आधार क्रमांकाद्वारे : जर आधार कार्ड बँकला जोडले असेल तर हा पर्याय वापरता येतो.

यामध्ये ॲप इतक्या सोयी नसल्या तरी या पद्धतीच वैशिष्ट्य म्हणजे हे अगदी साध्या फीचर फोन पासून स्मार्टफोन पर्यन्त सर्वच फोनमध्ये चालते. तेसुद्धा इंटरनेट शिवाय. त्यामुळे याचा उपयोग अनेकांना होऊ शकतो.

# मोबाइल बँकिंग म्हणजे काय? ते कसे वापरायचे?

मोबाइल बँकिंग हा व्यवहार करण्याचा नवा मार्ग असून यामुळे रोख रक्कम जवळ बाळगण्याची किंवा साध्या कामासाठी बँकेमध्ये फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही. आता ही सुविधा जवळपास प्रत्येक प्रमुख बँकेमध्ये उपलब्ध असून मोबाईल ॲप्सद्वारे, एसएमएस द्वारे किंवा USSD द्वारेसुद्धा बँकिंगसाठी पर्याय उपलब्ध झाले आहेत. याबद्दल आपण एसबीआय एसएमएस बँकिंगची प्रक्रिया पाहूया.

मोबाइल एसएमएस बँकिंगसाठी नोंदणीची प्रक्रिया :

१. प्रथम खालील प्रमाणे एक SMS तुमच्या फोनवरून पाठवायचा आहे.
**<MBSREG>** हा एसएमएस **९२२३४४००००** या क्रमांकावर पाठवा. तुम्हाला एक एसएमएस येईल ज्यामध्ये एक यूजरआयडी व एमपीन दिलेला असेल.

२. आता सर्वात आधी तो आलेला एमपीन (MPIN) बदलावा लागेल.
त्यासाठी **SMPIN <user id> <old pin> <new pin>** असा मेसेज **९२२३४४००००** या क्रमांकावर पाठवा.
उदा. जर तुमचा userid abc१२३ व mpin ६५४९८७ असेल आणि तुम्हाला नवा mpin ६५४३२१ असा लावायचा आहे तर खालीलप्रमाणे पाठवावा लागेल : SMPIN abc१२३ ६५४९८७ ६५४३२१

३. यानंतर खात्री करण्यासाठी SACCEPT <user id> <new pin> हा मेसेज ९२२३४४०००० या क्रमांकावर पाठवा. उदा. SACCEPT abc१२३ ६५४३२१

४. हा मेसेज पाठवल्यानंतर तुम्हाला पिन बदलल्याचा मेसेज येईल. त्यामध्येच पुढील नोंदणीची कृती ATM मध्ये जाऊन करायची आहे. यासाठी तुमचा मोबाइल व एटीएम कार्ड घेऊन जवळच्या एटीएम केंद्रावर जा.
आता ह्याला तीन पर्याय उपलब्ध आहेत. तुम्हाला सोयिस्कर वाटणारा पर्याय निवडा.

a. एटीएममध्ये जाऊन
b. नेटबँकिंगद्वारे ऑनलाइन वेबसाइटद्वारे
c. बँकेच्या शाखेमध्ये जाऊन

वरीलपैकी पर्याय a उदारहरणादाखल दिला आहे :-

५. आता एटीएम मशीनमध्ये नेहमीप्रमाणे कार्ड टाका, एटीएम पिन टाका.

६. आता मोबाइल बँकिंग (Mobile Banking) हा पर्याय निवडा

७. आता Registration हा पर्याय निवडा. आता तुमचा मोबाइल क्रमांक टाका

८. मोबाइल बँकिंगसाठी नोंदणी झाल्याचा एसएमएस बँकतर्फे मिळेल.

ही प्रक्रिया स्टेट बँक ऑफ इंडियासाठी असून इतर बँकांनी सुद्धा ही सुविधा उपलब्ध केली असून तुम्ही त्या-त्या बँकबद्दल माहिती त्यांच्या वेबसाइटवर सहज पाहू शकता. जसे की Axis बँकसाठी Axis bank sms banking असा गूगल सर्च करा.

ह्याच सेवा SBI Freedom सारख्या ॲप्सद्वारे सुद्धा उपलब्ध आहे. म्हणजेच पर्याय अनेक उपलब्ध आहेत. आपण आपल्या सोयीनुसार कोणत्याही मार्गाने व्यवहार करू शकतो.

# प्लॅस्टिक मनी म्हणजे काय

प्लॅस्टिक मनी म्हणजे अशा प्रकारच चलन जे प्लॅस्टिक कार्डच्या रूपात बनवले आहे व छापील नोटांच्या ऐवजी वापरले जाते. प्लॅस्टिक मनीचे आपण रोज पाहतो ते रूप म्हणजेच क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड. छापील नोटांच्या नंतर चलनामध्ये बदल घडवून आणला तो थेट प्लॅस्टिक मनीनेच. यामुळे मोठी रोख रक्कम घेऊन फिरण्याची तितकी गरज उरली नाही. भारतात हे पर्याय बऱ्याच वर्षांपासून उपलब्ध झाले असून अलीकडे यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे.

प्लॅस्टिक मनी खालील प्रकारात उपलब्ध आहे :

१. डेबिट कार्डस

२. क्रेडिट कार्डस

**१. डेबिट कार्डस :** ह्या प्रकारच्या कार्डसना आपण Prepaid कार्डस म्हणू शकतो. कारण डेबिट कार्ड वापरण्यासाठी बँक खात्यामध्ये मध्ये रक्कम जमा केलेली असावी लागते. हे कार्ड बँक खात्यामध्ये शिल्लक रक्कम असेपर्यंतच वापरता येते. डेबिट कार्ड द्वारे विक्रेत्याकडे व्यवहार करताना कार्ड वापरल्यावर खातेधारकाच्या बँक खात्यामधून विक्रेत्याच्या खात्यात थेट जमा होते.

**२. क्रेडिट कार्डस :** ह्या प्रकारच्या कार्डसना आपण Postpaid कार्डस म्हणू शकतो. कारण ह्यामध्ये आपण आधी व्यवहार करून नंतर महिनाखेरीला पैसे बँकेत भरतो. यासाठी बँक खात्री करून खातेधारकाला एक मर्यादा घातलेले

क्रेडिट कार्ड देते ज्याद्वारे तो कधीही मर्यादेपर्यंत खरेदी करू शकतो. खरेदीवेळी बँक खातेधारकाच्या वतीने पैसे जमा करते व नंतर महिनाखेरीस बँक बिल पाठवते ज्यानुसार खातेधारक ती रक्कम बँकमध्ये जमा करतो.

### क्रेडिट आणि डेबिट कार्ड मधील साम्य :

- सर्व कार्डस प्लॅस्टिकचे बनवलेले असतात व यामध्ये स्ट्रिप/पट्टी बसवलेली असते.
- सर्व कार्डस बँकातर्फेच पुरवली जातात
- सर्व कार्डस सामान्य व्यवहार जसे की पैसे काढणे, पैसे ट्रान्सफर, ऑनलाइन पेमेंटसाठी वापरता येतात.
- कार्ड वापरण्यासाठी वार्षिक फी आकारली जाते.

### क्रेडिट आणि डेबिट कार्ड मधील फरक :

| | |
|---|---|
| क्रेडिट कार्ड पोस्टपेड स्वरूपाचे असते | डेबिट कार्ड प्रीपेड स्वरूपाचे असते |
| क्रेडिट कार्डची मर्यादा बँक निश्चित करते | डेबिट कार्डची मर्यादा खात्यामध्ये रक्कम शिल्लक असेपर्यंत असते |
| क्रेडिट कार्डची बिल दर महिन्याला भरावे लागते | डेबिट कार्डला कोणत्याही प्रकारचे बिल नाही |
| क्रेडिट कार्डवर ठराविक कालावधीत पैसे भरले नाही तर व्याज द्यावे लागते | डेबिट कार्डवर व्याज आकारणी नसते |

## क्रेडिट व डेबिट कार्डसचा उपयोग :

- एटीएममधून पैसे काढण्यासाठी/भरण्यासाठी
- खरेदी करण्यासाठी (By POS Machines)
- ऑनलाइन व्यवहार करण्यासाठी (सर्व प्रकारचे व्यवहार जसे की रीचार्ज, तिकीट आरक्षण, बिल भरणा,इ)




**VISA व Mastercard म्हणजे काय ? :** या दोन केवळ पेमेंटच्या पद्धती आहेत. ह्या पद्धतींच्या नेटवर्कमधून व्यवहार केले जातात. ज्यामुळे व्यवहार सुरक्षित होतात. वरकरणी VISA आणि Mastercard यांच्यात काहीही फरक नाही. दोन्हीमध्ये केवळ स्पर्धात्मक ऑफर्स किंवा सुविधा यांच्यात थोडाफार फरक असतो बाकी अलीकडे सर्वच ठिकाणी दोन्ही पद्धती उपलब्ध असतातच. त्यामुळे ग्राहकांना थेट परिणाम होईल असा फरक नाहीये. संस्था असून या संस्थांचा प्रत्यक्ष कार्डनिर्मितीत सहभाग नसून केवळ व्यवहारांना सुरक्षित मार्ग दाखवणे हे यांचे काम आहे.

भारतामध्ये VISA, Mastercard, Maestro, RuPay कार्ड बँकातर्फे खातेधारकांना दिले जातात. RuPay पद्धत भारताच्या NCPI (National Payments

Corporation of India) संस्थेने जाहीर केली आहे. VISA card आणि प्रवासाचा विजा (Visa- जो शक्यतो विमानप्रवासासाठी दिला जातो) यांचासुद्धा काहीही संबंध नाही.

**आंतरराष्ट्रीय कार्डस :** ह्या कार्डस द्वारे आंतरराष्ट्रीय व्यवहार करता येतात जे नेहमीच्या कार्डसद्वारे शक्य नसते. बँकाच्या निर्बंधामुळे यासाठी वेगळे कार्ड मागवावे लागते. जे नंतर तुम्ही Paypal सारख्या पेमेंट पद्धतीला वापरू शकता. खासगी बँका यासंदर्भात आघाडीवर आहेत (HDFC, Axis, ICICI, इ). मात्र यासाठी बँकच्या साइटवर जाऊन International Banking Enable करावं लागेल. हे कार्डस आपण ebay.com/amazon.com सारख्या साइटवर विदेशातून वस्तु मागवण्यासाठीसुद्धा वापरू शकतो.

**POS म्हणजे काय ?** पॉइंट ऑफ सेल : या पद्धतींमध्ये आपण आपले प्लॅस्टिक मनी कार्ड विक्रेत्याच्या काऊंटरवर असलेल्या POS मशीनमध्ये स्वाईप करून पैसे देतो. POS मध्ये विक्रेता किंवा पैसे स्वीकारणाऱ्या व्यक्तीकडे POS मशीन असावे लागते जे त्याच्या खात्याला जोडलेले असेल. त्यानंतर त्याचा ग्राहक कार्ड स्वाईप करून पिन टाकतो व त्यानंतर ग्राहकाच्या खात्यामधून रक्कम थेट विक्रेत्याच्या खात्यामध्ये जमा होते. ग्राहकाला लगेच पावती/Receipt मिळते व SMS सुद्धा येतो. ही पीओएस मशीन्स आता पेट्रोल पंम्प, दुकाने, थिएटर अशा सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असतातच.



**कार्डसच्या सुरक्षिततेसाठी काही सूचना :**

१. तुमच्या कार्डचा पिन कधीही कोठेही अजिबात लिहून ठेऊ नका.

२. कार्डचा पिन कधीही कोणालाही अजिबात सांगू नका.
३. कार्डच्या मागे दिलेल्या जागेमध्ये सही करून ठेवा.
४. व्यवहार करून झाल्यावर कार्ड काढून घ्यायला विसरू नका.
५. हॉटेल, दुकाने यासारख्या ठिकाणी कार्ड दुसऱ्या व्यक्तीच्या ताब्यात देऊ नका. स्वतःच्या समक्ष व्यवहार करा.
६. कार्डचा फोटो/स्कॅन कोणाला पाठवू नका किंवा काढू देऊ नका.
७. कार्ड ऑनलाइन शॉपिंगसाठी वापरताना तुमचे कार्ड डिटेल्स कधीही त्या साइटवर साठवू नका.
८. नेटकॅफे सारख्या सार्वजनिक ठिकाणी कार्ड वापरू नका.
९. तुमच्या कार्डवरील CVV, आलेला OTP, यूजरनेम/पासवर्ड कोणालाही सांगू नका.
७. तुमच्या कार्डचे बँक खाते मोबाइल क्रमांकाला जोडून घ्या, जेणेकरून कोणताही व्यवहार झाला की तुम्हाला बँकचा SMS मेसेज येईल.
८. कार्ड हरवल्यास ताबडतोब बँकमध्ये कळवा आणि ते ब्लॉक करून टाका. यासाठी बँकांनी स्वतःचे काही खास क्रमांक जाहीर केले आहेत. ते तपासून फोनमध्ये साठवून ठेवा.

उदा. तुमचे कार्ड ब्लॉक करण्यासाठी खालील SMS पाठवा.

BLOCK XXXX हा एसएमएस ५६७६७९१ या क्रमांकावर तुमच्या बँक खात्याला जोडलेल्या फोन क्रमांकावरूनच पाठवा. इथे XXXX = तुमच्या हरवलेल्या कार्डवरील शेवटचे चार अंक

जर कार्ड ब्लॉक झाले असेल तर तुम्हाला आणखी एक एसएमएस येईल. जर नाही आला तर खालील फोन क्रमांकावर फोन करा.

३९ ०२ ०२ ०२ (याच्या आधी लोकल एसटीडी कोड जोडा मग डायल करा) किंवा
१८६० १८० १२९० किंवा १८०० १८० १२९० (from BSNL/MTNL lines)

# संपूर्ण प्रक्रियेतील सर्वांगीण सुरक्षिततेसाठी काही सूचना
## (अवश्य कराव्यात, आणि कटाक्षाने टाळाव्यात अश्या काही बाबी)

बँकिंग व्यवसाय आधुनिक झाला आणि त्याचबरोबर त्यातील फसवाफसवीचे प्रमाण वाढू लागले. आता तर रोकडरहित अर्थव्यवस्था राबवायची आहे, म्हणजे सर्वच व्यवहार मोबाईलद्वारे किंवा अन्य डिजिटल माध्यमातून करणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच जाणार. म्हणजेच, बँक खाते क्रमांक पळवण्यापासून पिन, पासवर्ड चोरण्यापर्यंत आणि ग्राहकाला फसवून बँक खात्याची माहिती घेण्यापासून ते बँकेची खोटी वेबसाइटच तयार करेपर्यंत या चोरांची मजल जाणार. अश्या विविध पद्धतीने आपण लुबाडले जाऊ नये, आणि या फसव्या जाळ्यापासून स्वतःला दूर ठेवता यावे, याचे मार्गदर्शन करणारा हा पाठ आहे.

### सर्वसाधारण:

- तुमच्या बँक खात्यातील प्रत्येक व्यवहाराची सूचना एस.एम.एस. द्वारे नियमितपणे मिळवण्यासाठी तुमचा मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदवा.
- तुमच्या बँक खात्याला तुमचा आधार क्रमांक जोडून घ्या, म्हणजे बँकेच्या "के.वाय.सी." नियमांची पूर्तता होईल आणि आपली विशिष्ठ ओळखही निर्माण होईल.
- तुमच्या विविध कार्डांचे "पिन" क्रमांक कोणासही सांगू नका, किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने उघड करू नका.
- केवळ विश्वासार्ह व खात्रीच्या व्यापा-यांकडेच खरेदी, किंवा अन्य आर्थिक व्यवहार करा.
- तुम्ही ए.टी.एम. मध्ये कोणताही व्यवहार करत असताना कोणी त्रयस्थ व्यक्ती तुमच्यावर लक्ष ठेऊन तर नाही ना, किंवा तुमच्यावर पाळत ठेवून तर नाही ना, याकडे लक्ष द्या आणि तशी खात्री करूनच व्यवहार करा.

- कोणताही रोकडरहित व्यवहार करत असताना काही अडचणी आल्यास त्याच्या निराकरणाकरिता तत्स्थळी उपस्थितांपैकी कोणत्याही त्रयस्थ, अनोळखी, किंवा संशयास्पद व्यक्तीचे सहाय्य किंवा मार्गदर्शन घेऊ नका. त्यातून फसवणूक किंवा लुबाडणूक होण्याच्या शक्यता दाट असते.
- एटीएम मशिन किंवा कार्डद्वारे पैसे अदा करण्याच्या ठिकाणी मशिनना स्कीमर लावण्यात येतात. हे स्कीमर जिथे कार्ड स्वाइप करण्यात येते, त्याच ठिकाणी अशाप्रकारे लावण्यात येते, की तो एटीएम मशिनचाच एक भाग असल्यासारखे दिसते. जेव्हा तुम्ही मशिनमध्ये कार्ड टाकता किंवा स्वाइप करता त्यावेळी हा स्कीमर तुमच्या कार्डमधील माहिती मिळवते.
- एटीएम मशीनच्या बटणांना खळ किंवा डिंक लावून ती बटणे काम करणार नाहीत याची व्यवस्था करण्यात येते. एखादी व्यक्ती पैसे काढण्यासाठी आल्यानंतर त्याचे एटीएम कार्ड मशनिमध्ये टाकल्यानंतर बटणे दाबल्यास ती दाबली जात नाहीत. अशावेळी भामटे तुमच्याजवळ येऊन तुम्ही कोणती बटणे दाबताय हे पाहतात. तुम्हाला मदत करण्याचा किंवा तुमची समस्या ऐकण्याचा बहाणा करत पिन नंबर जाणून घेतात. तसेच, तुमचे कार्ड अडकून असल्यास तुम्ही गेल्यानंतर पिन नंबर वापरून पैसे काढून घेतात.
- “पॉइंट ऑफ सेल” (दुकानात पैसे देण्याच्या) काऊंटरवर कार्ड वापरून पेमेंट करण्याची वेळ आल्यास कार्डाचा पिन टाइप करताना काळजी घ्या. विक्रेत्याला कधीही पिन देऊ नका किंवा सांगू नका. त्याचप्रमाणे तुमच्या कार्डावर कुठेही पिन लिहून ठेवू नका किंवा कार्ड ठेवत असलेल्या कव्हरमध्ये पिन लिहून ठेऊ नका.
- आपल्या खात्यातील व्यवहार नियमितपणे तपासा. खात्यात एखादा गैरव्यवहार झाल्यास त्याची माहिती बऱ्याच दिवसांनंतर बँकेला ग्राहकाकडून दिली जाते. याचे कारण म्हणजे, खात्याचे पासबुक किंवा स्टेटमेंट पाहिल्यावरच ही बाब ग्राहकांच्या लक्षात येते. यासाठी तुमचे बँक खाते नियमितपणे तपासा.

## आपला मोबाईल:

- आपल्या आवश्यकतेप्रमाणे नामांकित कंपनीचा, आधुनिक प्रणाली असणारा (शक्यतो अद्ययावत अँड्रॉईड प्रणाली असलेला) मोबाईल वापरणे इष्ट राहील.
- अश्या मोबाईलचा वेग अधिक असतो, तसेच प्रक्रिया करण्याची क्षमता आणि माहिती साठवण्याची क्षमता पुरेशी असते.
- आपला जो मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असेल, तो क्रमांक शक्यतोवर बदलू नका.
- एकाहून अधिक सिम कार्ड वापरात असल्यास, त्यातील बँक खात्याला जोडलेला क्रमांक प्राथमिक ("प्रायमरी") ठेवा. बँकेचे सर्व संदेश याच क्रमांकावर येणार आहेत, हे लक्षात ठेवा.
- त्यामध्ये कोणतीही अनावश्यक ॲप इन्स्टॉल करू नका. तसे केल्याने आपल्या मोबाईलचा वेग तर कमी होतोच, पण त्याशिवाय त्यामध्ये व्हायरसेस आणि अन्य अनावश्यक घटक शिरकाव करण्याची शक्यता निर्माण होते.
- मोबाईलद्वारे कोणताही आर्थिक व्यवहार करत असताना त्यासमयी नको असलेली ॲपस् शक्यतो बंद करा. तसे केल्याने मोबाईलमधील प्रक्रियांचा वेग वाढतो आणि आपले व्यवहार यशस्वीपणे पूर्ण करणे सोपे जाते.
- मोबाईलचा वापर करताना आपण काही मूलभूत खबरादारी घेणे अत्यंत गरजेचे आहे.
- सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या बँक खात्यासंदर्भातील कोणतीही माहिती (म्हणजे खाते क्रमांक, डेबिट आणि क्रेडीट कार्ड पीन) मोबाईल डिव्हाइसमध्ये स्टोअर करू नका.
- तुम्ही बँकिंग ॲप युज करत असाल तर तुमच्या ॲपचा युजर नेम आणि पासवर्ड मोबाईलमध्ये सेव्ह करून ठेऊ नका. चुकीच्या हातात मोबाईल गेल्यावर त्याचा गैरवापर होऊ शकतो.
- आजकाल अनेक सार्वजनिक ठिकाणी विनामुल्य वाय-फाय सेवा उपलब्ध असते, जसे की रेल्वे स्टेशन्स, विमानतळ, मॉल्स, सिनेमा थियेटर्स, इत्यादी. अश्या पब्लिक वाय-फायचा वापर मोबाईल बँकिंगसाठी टाळा. तसेच

खात्यासंदर्भातील सूचना टेक्स्ट मेसेजद्वारे पाठवू नका. तसेच सेफ मोबाईल बँकिंगचा वापर करताना स्क्रिन अनलॉकचे ऑप्शन वापरा.

- अधिकृत ॲप्सचा वापर करा. अनधिकृत, अप्रमाणित, किंवा बनावट ॲपच्या वापरामुळे आपल्या मोबाइलमध्ये व्हायरस किंवा मालवेअरचा धोका असतो.
- योग्य ॲपचा वापर केला नाही तर तुमच्या ऑपरेटिंग सिस्टिमला मालवेअरचा धोका होण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे कोणतेही ॲप डाऊललोड करताना सावधनता बाळगा.
- बँकेची भासतील, अशी  बनावट ॲपस् तयार करण्यात येतात आणि त्या माध्यमातून बँकेविषयी तसेच तुमची महत्त्वपूर्ण माहिती मिळवून पैसे काढून घेण्यात येतात.
- अनोळखी कॉलपासून सावधान. जेव्हा तुम्हांला एखाद्या अनोळखी नंबरवरून मिस्ड कॉल आला तर त्यावर पुन्हा कॉल करताना सावधानता बाळगा. यामुळेही तुम्हांला मालवेअरचा धोका वाढतो. अशा कॉलसाठी तुम्हाला अधिक शुल्क द्यावे लागेल. तसेच फोन सुरू असताना तुमचा डेटा ट्रान्सफरही होऊ शकतो.
- ई-मेलपासून सावध रहा: तुमच्या बँक खात्याची माहिती अद्ययावत करा, असे सांगणारे ई-मेल तुम्हाला आली, तर अशी कोणतीही माहिती त्यावर देऊ नका. असा ई-मेल हा फिशिंग मेल असू शकतो. याचा परिणाम ओळख चोरीत (म्हणजे तुमची गोपनीय माहिती चोरण्यात) होऊ शकतो.
- सोशल मीडियाच वापर करताना सावधान. सोशल मीडियाचा वापरत करतानाही विशेष काळजी घेण्याची गरज आहे. मालवेअर अटॅकसाठी सर्वात घातक प्लॅटफॉर्म सोशल मीडिया आहे. सोशल मीडियामध्ये बरेच युजर अशा काही माहिती शेअर करतात त्यामुळे मालवेअर अटॅक होण्याची शक्यता आहे. कोणत्याही अशा लिंकवर क्लिक करू नका जी तुम्हांला एखाद्या अनसेफ साइटवर रिडायरेक्ट करेल. तसेच अशा कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका जी तुम्हांला बँकेच्या साइटवर घेऊन जात असेल. ती बनावटी वेबसाइट असू शकते. तसेच टेक्स मेसेज किंवा इमेल करण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करू नका.

## मोबाईल हरवल्यास

- मोबाईल हरवल्यास काही गोष्टी तातडीने करणं गरजेचे आहे. या गोष्टी नेहमी लक्षात ठेवा.
- सर्वात आधी कॉल करा: तुमचा जो कोणता फोन हरवला आहे त्यावर आधी (दुसऱ्या एखाद्या मोबाईलमधून) एक कॉल करा. कॉल लागत नसल्यास त्यावर एक मॅसेज करा. तुमचा हरवलेला फोन कोण्या भल्या व्यक्तीकडे असेल तर तो तुम्हाला परत मिळण्याची शक्यता असते.
- पासवर्ड बदला: तुमचा फोन हरवल्यास जितक्या लवकर शक्य असेल तितक्या लवकर डेस्कटॉपवरुन तुमचे पासवर्ड बदला. सोशल मीडिया अकाऊंट, ईमेल आयडी किंवा अगदी ई-बँक सेवेचे पासवर्ड बदला.
- अंड्रॉइड डिव्हाइस मॅनेजर: हे फीचर तुमच्या फोनचे लोकेशन शोधून काढण्यात मदत करू शकते. यामुळे तुमचा हरवलेला फोन लॉकही केला जाऊ शकतो.
- कार्ड ब्लॉक करा: तुमच्या टेलिकॉम ऑपरेटरला कॉल करुन तुमचे सिम कार्ड ब्लॉक करुन टाका. यामुळे तुमच्या सिमकार्डचा कोणी दुरुपयोग करणार नाही.
- पोलिसांना माहिती द्या: पोलिसांना तुमचा फोन हरवल्याची माहिती द्या. तुमचा फोन सापडल्यास ते तुम्हाला सांगू शकतील.